**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात सर्व खासगी रुग्णालयं आणि नर्सिंग होम्सचा आढावा घेण्यासाठी सरकार समिती स्थापन करणार

- जलजीवन अभियानाअंतर्गत राज्यात आतापर्यंत २६ हजार ४९९ कामं पूर्ण

- कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आधुनिक उपाययोजनांचा प्रभावी वापर करण्यासाठी राज्य शासनाचा करार

- रेल्वे मंत्रालयाच्या अनुदान मागण्यांवर लोकसभेत चर्चा सुरू

**आणि**

- ओदिशात कटक इथं रुग्णालयाला आग लागून १० जणांचा मृत्यू

**<><><><><>**

मुंबईप्रमाणेच राज्यातल्या सर्व खासगी रुग्णालयं आणि शुश्रुषागृहांचा आढावा घेण्यासाठी, आणि नोंदणी नसलेल्या अशा आस्थापनांवर कारवाई करण्यासाठी एक समिती स्थापना करण्याची घोषणा नगरविकास खात्याचे प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत केली. नगरविकास खात्याचे अतिरिक्त मुख्य सचिव या समिताचे अध्यक्ष असतील. आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, संचालक, विभागीय आयुक्त, तसंच पोलीस महासंचालक यांचाही या समितीत समावेश असेल. याशिवाय, आवश्यकतेनुसार इतर अधिकाऱ्यांना समितीत घेण्याचे अधिकार अध्यक्षांना दिले जातील. आमदार चित्रा वाघ यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला सामंत उत्तर देत होते.

सफाई कामगारांच्या वारसा हक्कांसंदर्भात लाड-पागे समितीच्या शिफारशींनुसार सगळी प्रकरणं येत्या ६ महिन्यांत निकाली काढावीत, असे निर्देश

बृहन्मुंबई महानगरपालिकेला देण्यात येतील, असं आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी उमा खापरे यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात दिलं.

राज्य शासनाच्या विविध खात्यांकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला एकंदर १० हजार ९४८ कोटी रुपये येणं असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. आमदार सुनील शिंदे यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. आर्थिक उत्पन्नाचे स्रोत वाढवण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे, असं ते म्हणाले. या प्रश्नावर झालेल्या चर्चेने विरोधकांचं समाधान न झाल्यामुळे आणि शासन किती वेळात महानगरपालिकेचं देणं कधी देणार, या प्रश्नाचं उत्तर सरकारने न दिल्याचा आरोप करून विरोधकांनी सभागृहात घोषणाबाजी केली. त्यानंतर त्यांनी सभात्याग केला. दावोसमध्ये झालेल्या सामंजस्य करारांच्या अंमलबजावणीबाबत सरकार भगवी पत्रिका काढेल, असं सामंत यांनी सांगितलं. दावोसपासून ते जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदांमध्ये झालेल्या सर्व सामंजस्य करारांची अंमलबजावणी करू, असं आश्वासन त्यांनी दिलं.

सन २०३७पर्यंत एसटी महामंडळाच्या ताफ्यातल्या सर्व बस इलेक्ट्रिक करायची योजना आखल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत दिली. सध्या महामंडळाकडे २२ हजार साध्या बस, तर ८००च्या आसपास इलेक्ट्रिक बस आहेत. २०३७पर्यंत टप्प्याटप्प्याने या साध्या बसेसचं रूपांतर इलेक्ट्रीक बसमध्ये करायचा मानस असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारने डिसेंबर २०२६ पर्यंत जलजीवन अभियानाला मुदतवाढ दिली असून महाराष्ट्रात आतापर्यंत या अंतर्गत २६ हजार ४९९ कामं पूर्ण झाल्याचं मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. नाना पटोले, अमिन पटेल, अस्लम शेख, नारायण कुचे यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. राज्यात जलजीवन अभियानांतर्गत कामं अर्धवट राहिल्याचं या सदस्यांनी

सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलं. यावर जलजीवन अभियानांतर्गत राज्यभरात ५१ हजार ५६० योजना सुरू असून यापैकी २५ हजार ६१ योजना प्रगतीपथावर आहेत असं गुलाबराव पाटील यांनी सांगितलं. या योजनेची तरतूद वाढवून ती ८ लाख ७९ हजार कोटींपर्यंत वाढवली आहे, महाराष्ट्राला केंद्र सरकारकडून १६ हजार कोटी येणं अपेक्षित आहे. राज्य सरकारने ४ हजार ८०० कोटी दिले आहेत असं पाटील यांनी सांगितलं. राज्यात या अभियानांतर्गत योजनांसाठी ३१ हजार ३६९ कोटी निधीची गरज असल्याचं मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितलं.

महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रुग्णांना मोफत उपचार देणं रुग्णालयांना बंधनकारक असून अतिरिक्त पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई केली जात आहे असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितलं. अशा ३३७ प्रकरणात ६० लाख ४७ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, तसंच १२ रुग्णालयांवर कारवाई केली आहे असं त्यांनी सांगितलं. पांढरं रेशनकार्ड धारकांना या योजनेंतर्गत मोफत उपचार उपलब्ध असून अतिरिक्त पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई केली जाईल असं आबिटकर यांनी स्पष्ट केलं. सुनील प्रभू, नाना पटोले यांनी याबाबत प्रश्न विचारला होता.

होमिओपॅथी डॉक्टरांना काही ॲलोपॅथी औषधं लिहून देण्याच्या परवानगी देण्यासंदर्भात सरकार सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची वाट पाहत असल्याचं वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधानसभेत सांगितलं. एका लक्षवेधी सूचनेला त्या  उत्तर देत होत्या.

**<><><><><>**

एलपीजी आणि सीएनजीच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यात नेमलेल्या समित्यांनी आत्तापर्यंत १ हजार २०८ सिलेंडर जप्त केले असून २३ गुन्हे दाखल करून १८ जणांना अटक केल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी आज विधानपरिषदेत दिली. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ३३ लाख ६६ हजार

रुपयांपेक्षा जास्त असल्याचं त्यांनी सांगितलं. एलपीजीला पर्याय म्हणून रॉकेल उपलब्ध करायचा विचार सरकार करत असून याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला पत्राद्वारे कळवलं आहे, अशी माहितीही भुजबळ यांनी दिली. केंद्र सरकारचे अधिकारी आणि मंत्र्यांच्या सातत्यानं संपर्कात आहोत, हळूहळू परिस्थिती निवळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यासंदर्भात नाना पटोले यांनी प्रतिक्रिया दिली…

**होल्ड बाईट**

**<><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय आधारित आधुनिक उपाययोजनांचा प्रभावी वापर करण्यासाठी राज्य शासन आणि वाधवानी एआय, या ना-नफा-ना-तोटा तत्वावर कार्यरत संस्थेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत आज मुंबईत हे करार करण्यात आले. या कराराअंतर्गत क्षयरोग, मातृ - नवजात तसंच बाल आरोग्य, प्राथमिक आरोग्य सेवा, ई-हेल्थ आदी क्षेत्रांमध्ये एआय तंत्रज्ञानाचा समावेश करून आरोग्य सेवांचा दर्जा अधिक उंचावण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्यासाठी एआयचा वापर हा ‘फोर्स मल्टिप्लायर’ ठरणार असून, वाधवानी एआयच्या सहकार्याने एआय सक्षम आरोग्य व्यवस्था उभारणार असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं. तर, ही भागीदारी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम बनवणार असल्याचं आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सांगितलं.

**<><><><>**

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातल्या पहिल्या टप्प्यातल्या ८६४ पुनर्वसन सदनिकांचं वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत केलं. उर्वरित

लाभार्थ्यांचा प्रश्न न्यायप्रविष्ट असल्याने त्यांच्या पुनर्वसनाची कारवाई लांबली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट-**

विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

रेल्वे मंत्रालयाच्या अनुदान मागण्यांवर आज लोकसभेत चर्चा सुरू झाली. काँग्रेसचे तारिक अन्वर यांनी चर्चा सुरू केली. रेल्वेसाठी स्वतःच निर्धारित केलेली उद्दिष्ट गाठण्यात सरकारला अपयश आल्याचा आरोप त्यांनी केला. भाजपाचे गणेश सिंग यांनी सांगितलं, की गेल्या १० वर्षात रेल्वेत आमूलाग्र बदल होत असून रेल्वेचं जाळं दिवसेंदिवस विस्तारत आहे.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या महिला उद्योजकांसाठी सुरू केलेल्या स्टँडअप इंडिया योजनेची सुधारित आवृत्ती लौकरच केंद्रसरकार आणणार असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत सांगितलं. गेल्या वर्षी या योजनेचा कालावधी संपला. मात्र नीती आयोगाने या योजनेचा अभ्यास करुन त्याचा फायदा अधिक लाभार्थ्यांना मिळावा यादृष्टीनं सुधारित मसुदा तयार केला आहे, असं त्या म्हणाल्या.

**होल्ड बाईट**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात आज प्रथमच लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास कोणत्याही व्यत्ययाविना पार पडला. गेले काही दिवस एलपीजी आणि इतर मुद्द्यांवरुन गदारोळ होत राहिल्यानं प्रश्नोत्तराचा तास पूर्ण होऊ शकला नव्हता.

<><><><><>

बारामती विधानसभा पोट निवडणुकीत उमेदवार न देण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं घेतला आहे. अजित पवार यांच्या निधनानं रिक्त झालेल्या या जागेवरुन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. राहुरीच्या संदर्भात महाविकास आघाडीतले पक्ष एकत्र बसून निर्णय घेतील, अशी माहिती खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.

<><><><><>

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. १० राज्यांमधल्या ३७ रिक्त जागांपैकी २६ जागांवर बिनविरोध निवड झाली आहे. त्यात महाराष्ट्रातल्या ७ जागांचा समावेश आहे. बिहारमधे ५ जागांसाठी, ओदिशात ४ ,आणि हरियाणात दोन जागांसाठी आज मतदान होत आहे.

<><><><><>

ओदिशामधे कटक इथल्या एस.सी.बी रुग्णालयाच्या ट्रॉमा केअर सेंटरला आज पहाटे लागलेल्या आगीत १० जणांचा मृत्यू झाला. मृतांमधले बरेच जण रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल रुग्ण होते. या घटनेत रुग्णांना वाचवताना रुग्णालयातले ११ कर्मचारी होरपळून जखमी झाले आहेत. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. केंद्रसरकार मृतांच्या कुटुंबांना २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपये मदत देणार आहे.

//<><><><><>//